Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ८] बुधवार, नोव्हेंबर १७, २०२१/कार्तिक २६, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-नागपूर विभागीय पुरवणी

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. २२.

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १), यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम १९(१) अन्वये.**

क्रमांक-उजि(भू)-वि.पा.वि.म.-कावि-११२–२०२१.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) आणि (यात यापुढे ज्याचा निर्देश “ उक्त अधिनियम ” असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक क.लि.-उजि(भू)-वि.पा.वि.म.-कावि-१२१–२०२१, दिनांक २२ जानेवारी २०२१, अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या गावठाणा मधील जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, नागपूर जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त गावठाणाची जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी “ पुनर्वसाहत क्षेत्र ” म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी श्रीमती डॉ. शिवनंदा लंगडापुरे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक १-अ-६५-२०२०-२१, प. ह. नं. ......, गाव-भिवापूर, तालुका-भिवापूर, जिल्हा नागपूर.

| अनुक्रमांक | सर्व्हे क्रमांक किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ४२८ | ० ०३ |
| २ | ४२९ | ० ०२ |
| ३ | ४३० | ० ०२ |
| ४ | ४३१ | ० ०२ |
| ५ | ४३२ | ० ०२ |
| | एकूण अदमासे क्षेत्र . . | ० ११ |

**अनुसूची—दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव :— मोखाबर्डी उपसा सिंचन योजना.

प्रकल्प कार्याचे वर्णन :— मोखाबर्डी उपसा सिंचन योजनेअंतर्गत मुख्य कालव्यावरून तास लघु कालवा क्र. २ चे टेलिंगचे बांधकामाकरीता.

समाजाला मिळणारे लाभ :— मोखाबर्डी उपसा सिंचन योजनेचा लाभ सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंदे व शेतजमीनीला होणार आहे.

**अनुसूची—तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

विस्थापित होत नाही.

**अनुसूची—चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र. एलएसी-कार्या-२५-कावि-१०८८/२०२०, दिनांक १९-११-२०२०

**टीप :–**उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**डॉ. शिवनंदा लंगडापुरे,**
उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन क्र. १),
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.

नागपूर :
दिनांक ११ नोव्हेंबर २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.